राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या ३०४ तालुक्यांव्यतिरिक्त ०६ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहिर करून उपाययोजना व सवलती लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

मदत व पुनर्वसन विभाग

शासन निर्णय क्रमांक:- समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक :- १९ नोव्हेंबर २०२६

वाचा:- १) शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/२०१७/म-७, दि.०७ ऑक्टोबर, २०१७
२) शासन निर्णय, क्रमांकः संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/२०१७/म-७, दि. २८ जून, २०१८
३) शासन निर्णय क्रमांकः समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि. २२ सप्टेंबर, २०२६
४) शासन निर्णय क्रमांक: समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि. २५ सप्टेंबर, २०२६
५) शासन निर्णय क्रमांकः समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि. २९ सप्टेंबर, २०२६
६) शासन निर्णय क्रमांकः समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि. १४ ऑक्टोंबर, २०२६
७) मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीच्या दि. १७.११.२०२६ रोजी झालेल्या बैठक क्र. ०६ मधील निर्णय

प्रस्तावना:

दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १ व २ अन्वये सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. खरीप २०२६ च्या हंगामातील परिस्थितीच्या आधारे Trigger-१ (प्रथम कळ) व Trigger-२ (दुसरी कळ) लागू झालेले ३०४ तालुके संदर्भ क्र. ६ अन्वये दुष्काळी तालुके घोषित करण्यात आले आहेत. तद्नंतर उर्वरित तालूक्यांच्या दुष्काळी तालुक्यांमध्ये समावेश करण्याबाबत प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने मंत्रिमंडळ उपसमितीने दिलेल्या निर्देशानुसार दुष्काळसदृश्य परिस्थिती असलेल्या तालुक्यामधील प्रमुख ५ पिकांच्या २० टक्के सर्व्हेक्षण, ग्राऊंड ट्रथिंग (Ground Truthing) केंद्र शासनाच्या निकषानुसार करण्यात आले आहे. तद्अनुषंगाने जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेला अहवाल दि. १७.११.२०२६ रोजी मंत्रिमंडळ उपसमिती समोर सादर करण्यात आला असता, सदर बैठकीत नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी, पालघर जिल्ह्यातील वाडा व विक्रमगड, रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले व गडहिंग्लज हे ०६ तालुके दुष्काळी तालुके म्हणून घोषित करून विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तद्अनुषंगाने सदर तालुके दुष्काळ तालुके म्हणून घोषित करून विविध उपाययोजना व सवलती लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

राज्यातील तालुक्यांमध्ये जून ते आज पर्यंत (दि. ५ ऑक्टोंबर, २०२६ नंतर पावसाळा संपलेला आहे.) या कालावधीतील पर्जन्याची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी, पालघर जिल्ह्यातील वाडा व विक्रमगड, रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले व

गडहिंग्लज हे ०६ तालुके दुष्काळी तालुके म्हणून घोषित करून खाली प्रमाणे विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

१) जमीन महसूलात सूट
२) पिक कर्जाचे पुनर्गठन
३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती
४) कृषी पंपाच्या चालू विजबिलात सूट (७.५ हॉर्सपावर पर्यंत क्षमतेच्या विजपंपाचे वीज बिल अगोदरच माफ करण्यात आले आहे. त्यावरील वीज पंपांना सदर सूट लागू असेल)
५) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी
६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरु करणे
७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर
८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे
९) शेतीवर आश्रित शेतकरी/मजूर इत्यादी यांना अन्न धान्याची टंचाई होणार नाही याबाबत व्यवस्था उभी करणे
१०) जनावरांना आवश्यक चारा उपलब्ध होईल याची व्यवस्था करणे
११) जलसंधारणाची कामे सुरु करणे
१२) अगोदरच निर्गमित करण्यात आलेले शासन निर्देशाप्रमाणे पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी पाण्याचे नियोजन करणे

३. सदर दुष्काळी तालुक्यांमधील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शेत पिकांच्या नुकसानीबाबतची मदत, विहीत कार्यपध्दतीची पूर्तता करुन स्वतंत्र शासन निर्णयान्वये जाहीर केला जाईल.

४. या आदेशान्वये देण्यात येणा-या विविध सवलतीपोटीचा आर्थिक भार संबंधित प्रशासकीय विभागांनी उचलावा व त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा. त्यानुसार या प्रकरणी पुढील उचित कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१११९१५५५४८११४१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SUNIL SAHADEV SAMANT
Date: 2026.11.19 15:56:55 +05'30'

(सुनिल स. सामंत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१)मा. राज्यपाल यांचे सचिव, मलबार हिल. मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह)) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा आणि युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) सर्व मा. लोकसभा सदस्य/राज्यसभा सदस्य (महाराष्ट्रातील).

६) सर्व मा. विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य.
७) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
८) मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुबई.
९) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) अपर मुख्य सचिव, महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) अपर मुख्य सचिव, ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) अपर मुख्य सचिव, वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) प्रधान सचिव,सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) प्रधान सचिव,जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) सचिव,ग्रामविकास व पंचायत विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) सचिव, नियोजन विभाग (रोहयो), मंत्रालय, मुंबई.
१९) सचिव, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०) सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१) सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२) सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३) सर्व विभागीय आयुक्त.
२४) सर्व जिल्हाधिकारी.
२५) आयुक्त (कृषि), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२६) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
२७) महालेखापाल १/२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
२८) सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी
२९) वित्त विभाग (व्यय-९/ अर्थसंकल्प/अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.
३०) सह सचिव तथा वित्तिय सल्लागार, मदत व पुनर्वसन विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय, मुंबई.
३१) कार्यासन क्रमांक मदत-१/मदत-३, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३२) निवडनस्ती, (कार्यासन मदत-२)